# भगवंतराव शिवाजी पाटील महाविद्यालय, परतवाडा

## मराठी विभाग

## अहवाल – २०१८-१९

शैक्षणिक सत्र २०१८ -१९ मध्ये विभागाने दिनांक ०७ /०९ /०२०१८ ला सी. एम. कढी महाविद्यालय अचलपूर कॅम्प ,परतवाडा मधील मराठी विभागासोबत सामंजस्स करार केलेला आहे.आणि दि.०२ .०७ २०१८ ला श्रीमती राधाबाई सारडा महाविद्यालय अंजनगाव सुर्जी येथील मराठी विभागासोबत सामंजस्स करार केलेला आहे. दिनांक १६ /८ /२०१८ ते दिनांक २५ /०८ /२०१८ पर्यंत "मराठी शुद्धलेखन व चिकित्सक वाचन लेखन" या विषयावर प्रमाणपत्र कोर्स (Certificate Course) घेण्यात आला आहे. शैक्षणिक सत्र २०१८ -१९ मध्ये मराठी वांङ:मय मंडळाचे गठन दिनांक १० /०९/२०१८ ला मा. प्राचार्य डॉ. उमेकर यांच्या अध्यक्षतेखाली व मराठी विभाग प्रमुख प्रा. रवींद्र खंडेराव यांच्या मार्गदर्शनात तसेच प्रा. डॉ. गारोडे , प्रा. केदार, प्रा. चुके यांच्या उपस्थितीत करण्यात आले. त्या नुसार दिनांक २० /०९ /२०१८ ला स. १०.०० वाजता मराठी वांङ:मय मंडळाचा उद्घाटन समारंभ मा. डॉ. अरुण घोगरे यांच्या अध्यक्षतेखाली, प्रा.रवींद्र खंडेराव मराठी विभाग प्रमुख-यंच्या हस्ते, डॉ.प्रशांत विघे यांच्या प्रमुख उपस्थितीत तसेच मराठी विभाग प्रमुख प्रा. रवींद्र खंडेराव यांच्या मार्गदर्शनात तर डॉ. गारोडे , प्रा, केदार , प्रा. विपुल चुके यांच्या सहकार्याने संपन्न झाला.

विभागाने दिनांक २८ /०८ /२०१८ ला "संत साहित्यातील मूल्यविचार" या विषयावर व्याखान आयोजित केले. या कार्यक्रमाचे अध्यक्ष मा. प्राचार्य डॉ. उमेकर व प्रमुख वक्त्या प्राचार्य डॉ.अनुराधा वऱ्हाडे आणि प्राचार्य रा.भा.महाजन ,डॉ.घोगरे, मराठी विभाग प्रमुख प्रा. रवींद्र खंडेराव यांच्या मार्गदर्शनात आणि डॉ.गारोडे व डॉ.विघे यांच्या उपस्थितीत संपन्न झाले.

विभागाने दि. १/१०/२०१८ ला सुवर्ण जयंती महोत्सवा निमित्त आंतर महाविद्यालयीन विद्यापीठ स्तरीय वक्तृत्व स्पर्धेचे आयोजन केले होते. या स्पर्धेत विविध महाविद्यालयाचे ४५ स्पर्धक विध्यार्थी सहभागी झाले होते. माविद्यालयाने रोख पारीतोषीकासह प्रमाणपत्र प्रदान करण्यात आले.

विभागा अंतर्गत दि. ०३.०१.२०१९ ला स .१०.०० वा. क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले यांच्या जयंती दिनाचे आयोजन करण्यात आले. या कार्यक्रमाचे अध्यक्ष प्राचार्य डॉ. उमेकर तसेच मराठी विभाग प्रमुख प्रा. रवींद्र खंडेराव यांच्या मार्गदर्शनात व डॉ.गारोडे यांच्या उपस्थितीत संपन्न झाला.

कवी कुसुमाग्रज यांच्या जयंत्ती निमित्त 'मराठी भाषा गौरव दिनाचे दि .२७ .०२. २०१९ ला आयोजन केले. या कार्यक्रमासाठी प्रमुख वक्ते प्राचार्य डॉ. काशिनाथ बर्हाटे सी.एम. कढी महाविद्यालय, अचलपूर कॅम्प, परतवाडा. तसेच मराठी विभाग प्रमुख प्रा. रवींद्र खंडेराव यांच्या मार्गदर्शनात तसेच प्रा. डॉ. गारोडे यांच्या उपस्थितीत सामान्न झाला.